चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२१ जुन, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# दारू तस्करांविरूध्द चंद्रपुर पोलीसांचे धाडसत्र सुरूच

दिनांक २०/०६/२०२० रोजी चंद्रपुर जिल्हयात पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात दारूतस्कांवर आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशन अंतर्गत वेगवेगळे पथके तयार करून अवैध दारू तस्कराविरूध्द पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन ९ गुन्हे नोंद करण्यात पोलीसांना यश आले आहे. यामध्ये ११ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन **एकुण १४,२३,२५०/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

- **पोलीस स्टेशन नागभिड** हद्दीत अवैध मोहा सडवा दारू संबधाने कार्यवाही करीत एक गुन्हा नोंद करून **एकुण १,१३,७००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- **पोलीस स्टेशन भद्रावती** येथे अवैध दारूबाबत दोन गुन्हे नोंद करून ८,५०,०००/— रू च्या मुद्देमालासह ०२ आरोपीस अटक करण्यात आली आहे.
- **पोलीस स्टेशन राजुरा** हद्दीत अवैध दारूबाबत दोन गुन्हे नोंद करून ०४ आरोपीतांकडुन २,७७,८५०/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
- **पोलीस स्टेशन घुग्घुस** हद्दीत एक गुन्हा नोंद करून ०२ आरोपीतांना कडुन **एकुण १३,१००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- **पोलीस स्टेशन पडोली** हद्दीत एक गुन्हा नोंद करून ०१ आरोपी कडुन **एकुण ९०,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला अ आहे.
- **पोलीस स्टेशन भिसी** हद्दीत एक गुन्हा नोंद करून ०१ आरोपीकडुन **एकुण ५९,६००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
- **पोलीस स्टेशन शेंगाव** हद्दीत एक गुन्हा नोंद करून ०१ आरोपी कडुन एकुण १९,०००/—रू चा माल मिळुन आला आहे.

———————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ जुन, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7447744100 (PRO)


## स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

### ५ लक्ष १९ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २०/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वेगवेगळे पथक तयार करून विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस स्टेशन भद्रावती परिसरात गोपनीय माहितीवरून दोन दुचाकी चालकास वाहनास ताब्यात घेवुन वाहनांची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात ५९० बॉटल देशी दारू ५९,०००/—रू किंमतीचा दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहतुकीकरीता वापरलेले दोन दुचाकी मोपेड किं. १,२०,०००/—रू असा **एकुण १,७९,०००/—रू** चा मुदद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे अप.क्रं. ३३०/२०२० अन्वये नोंद करण्यात आला आहे.

दुसरीकडे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा साखरी गावात सापळा रचुन एका चारचाकी वाहन मारूती ८०० यास संशयावरून ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये २४ बॉक्स देशी दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहतुकीकरीता वापरलेले वाहन असा **एकुण ३,४०,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सावली येथे अप.क्र. १२२/२०२० अन्वये नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास आणि आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक स्थागुशा श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. विकास मुंढे यांचे सह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

---

# शेगाव पोलीसांची कार्यवाही

## १२ बोअर बंदुकसह एक आरोपी अटकेत

दिनांक २१/०६/२०२० रोजी शेंगाव पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा वहानगाव ता. चिमुर येथील कमलसिंग अंधरेले यांचे घरी त्यांचे नातेवाईक जगदिपसिंग छोटुसिंग भोंड वय ३८ वर्ष रा. पळसगाव, सिंदेवाही हे बऱ्याच दिवसापासुन राहत असुन त्यांचे जवळ एक १२ बोअर बंदुक आहे. अशी माहिती मिळताच शेंगाव पोलीसांनी सदर इसमाच्या घरी छापा टाकला असता, जगदिपसिंग भोंड हा घरातच मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याचे घरी विना परवाना असलेली एक १२ बोअर बंदुक किं. ५,०००/—रू. ची मिळुन आली. सदर बंदुक ताब्यात घेवुन आरोपी नामे जगदिपसिंग छोटुसिंग भोंड वय ३८ वर्ष रा. पळसगाव, सिंदेवाही यास अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन शेंगाव येथे अप.क्र. २०५/२०२० कलम शस्त्र अधिनियम २५(३) सहकलम १८८ भादंवि अन्वये नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन शेंगाव श्री. सुधिर बोरकुटे यांचे नेतृत्वात पोउपनि. प्रविण जाधव, सफौ. क्षीरसागर, चौधरी, पोहवा. आमणे, पोशि. विठठ्ल, प्रदिप, प्रविण, सचिन, मपोशि. निकीता, भाग्यश्री यांनी पार पाडली.

---